प्रति,
मुख्याध्यापक
सर्व भाषिक शाळा

विषय :- प्रत्येक शाळेत प्रथोमपचार साहित्य पेटी असणेबाबत

बृ.म.न.पा. शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांना शाळेत होणाऱ्या किरकोळ अपघातासाठी किंवा किरकोळ दुखापतीसाठी तातडीने उपचार होण्यासाठी प्रत्येक शाळेत प्रथमोपचार साहित्य पेटी असणे आवश्यक आहे. या साहित्यपेटीत जंतुनाशक औषध (डेटॉल)मर्क्युरी लाल औषध, टिंक्चर आयोडिन, कापूस, गॉजपट्टी,स्टिकींग प्लॅस्टर,बनॉल,सोफ्रामायसिन ट्युब वा पावडर इ. साहित्य आर्वजून असावे. या औषधांच्या अंतिम दिनांक (Expiry DATE) बद्दल जागरुकता असावी. तसेच याबाबत ज्यादा माहितीसाठी वैदयकीय अधिकारी (शाळा) यांच्याशी संपर्क साधावा यासाठी शारीरीक शिक्षणाच्या शिक्षकाकडे विशेष जबाबदारी सोपवावी.

शाळेत भेटीसाठी जाणाऱ्या उपशिक्षणाधिकारी, अधीक्षक (शाळा) प्र.अ. (शाळा), विभाग निरिक्षक, समाज विकास अधिकारी, कनिष्ठ पर्यवेक्षक यांनी सदर प्रथमोपचार साहित्य पेटीची व्यवस्था शाळेत आहे का? याबाबत पहाणी करावी व शेरे पुस्तिकेत नोंद करावी. सदर साहित्य शाळेच्या सादिल खर्चातून किंवा सर्व शिक्षा अभियानाच्या शाळा अनुदानातून घेण्यात यावे.शाळेतील सर्व शिक्षकांना शाळेत होणाऱ्या अपघात कुशलतेने हाताळण्यासाठी प्रथमोपचार बाबत प्रशिक्षण देण्यात यावे. याकरिता समाज विकास अधिकारी यांना सिव्हिल डिफेन्स, होमगार्डद्वारेप्रशिक्षण आयोजित करण्यासाठी सहकार्य करावे. प्रशिक्षणासाठी अध्ययन – अध्यापनाचा वेळ वाया जाणार नाही यांची दक्षता घ्यावी.

प्रत्येक शाळेत शाळेच्या जवळील म.न.पा. दवाखाना, म.न.पा. शासकीय रुग्णालयाचे फोन नंबर, मुख्य वैद्यकीय अधिकारी (शाळा) विभागातील वैद्यकीय अधिकारी (शाळा) यांचे भ्रमण दूरध्वनी क्रमांक इ. माहिती दर्शनी भागावर लावण्यात यावी. जेणे करुन तात्काळ सेवा उपलब्ध होण्यासाठी मदत होईल.

याबाबतचा लेखी अहवाल प्र.अ.(शाळा)याच्याकडे करण्यात यावा.

शिक्षणाधिकारी

सर्व उपशिक्षणाधिकारी
सर्व अधिक्षक
सर्व प्र.अ.(शाळा)
सर्व विभाग निरिक्षक
सर्व समाज विकास अधिकारी
सर्व कनिष्ठ पर्यवेक्षक

प्रमुख अधिकारी